सामना

रविवार, दि. ९ मार्च १९९७-



# मनोरुग्णांचा आधार 'श्रद्धा'

पाच वर्षांपूर्वीची गोष्ट.

योगीनगर, बोरिवली पश्चिम. मुंबईतील एक उपनगर. याच योगीनगर-मध्ये माझं घर. जवळच एक मैदान. याच मैदानावर मी राहत होतो. घर असूनही घर नसल्यासारखा. कारण पैशाच्या तंगीमुळे तें घर एकाला मी भाड्याने दिले होते. या भाडेकरूने २५,००० रुपये डिपॉझिट म्हणून दिलेले. शिवाय भाडं २००० रुपये महिन्याला; परंतु मित्राने फसवले. पैसे गेले व दर महिना मिळणारे भाडे एकजण मला न सांगता घेऊन जायचा. पैसा हे सर्वस्व नसावं पण जरूरीपुरता तरी असावा हे कोणालाही पटेल. पण तोही मला मिळत नव्हता. कधीतरी भाडेकरूकडून २०० रुपये आठवड्याला मिळायचे. पण ते लगेच संपायचे. कारण तहान-भूक माणसाला सर्व विसरायला लावते हेच खरं. यामागे माझी कर्मकहाणी सांगण्याचा हेतु नाही. कारण वेगळंच आहे.

मी मनोरुग्ण झालो होतो. त्यामागेही कारण होतं. माझे आई आणि वडील जवळजवळ २० वर्षांच्या अनंत यातनांनंतर कॅन्सरमुळे संपले. पत्नी व मुलगी सोडून गेली. जवळचे मित्र व भाऊ अचानक गेले. प्रचंड मानसिक तणावामुळे मी खचलो. प्रत्येकाला दुःखही असतंच. मान्य; परंतु दुःखालाही मर्यादा असतात. मर्यादा, मग ती कोणतीही असो, ओलांडली गेली की माणूस फरफटत जातो. माणसातलं स्वत्वच हरवतो. माणूस, माणूस रहात नाही. सुख हे माणसाला हवं असतंच! मग ते कौटुंबिक असो, पैशाचं किंवा छंदाचं असो! मीही पूर्वीपासून लिहायचो. माझ्या मित्रांनी, द्वारकानाथ संझगिरी, निखिल वागळे या पत्रकारांनी, मला लिहायला लावलं.

तर काय मी मनोरुग्ण झालो होतो. कारण मला वाटायला लागलं की मी 'वॉशिंग्टन पोस्ट'चा पत्रकार आहे. असं का वाटायला लागलं हे मला अजूनही माहीत नाही. काही गोष्टी माहीत नसलेल्या बऱ्या असतात. परंतु परिस्थितीची जाणीव असावी लागते. तीच जाणीव मी विसरायला लागलो होतो. परिस्थिती माणसाला बदलवते; परतु मी मानसिक आजारामुळे परिस्थितीच बदलायला लागलो होतो. परिस्थितीचं भान मला राहिलं नव्हतं.

याच अवस्थेत मी पांच वर्षांपूर्वी एके संध्याकाळी योगीनगरच्या मैदानावर बसलो होतो.

क्रिकेट खेळून झालं होते. मी चहा पिण्यासाठी म्हणून मैदानाबाहेर पडलो आणि तेवढ्यात एक गाडी माझ्याजवळ येऊन थांबली. टाय लावलेले एक गृहस्थ उतरले व त्यांनी मला विचारलं, 'तू आजारी आहेस, हॉस्पिटलमध्ये येतोस का?' मी विचारलं, 'तुम्ही कोण?'

ते म्हणाले, 'जवळच माझं नर्सिंग होम आहे तर तिथे तू चल.'

मीही तयार झालो व ते मला त्यांच्या श्रद्धा नर्सिंग होममध्ये घेऊन आले. त्यांची पत्नी डॉ. स्मिता वलवानी व स्वतः डॉ. भरत वलवानी हे नर्सिंग होम चालवितात.

तर काय मला घर मिळालं. डॉ. भरत व स्मिता यांनी मला पहिल्यापासून प्रेमाची, आपुलकीची वागणूक दिली. रोगाचं निदानही केलं व औषधं, इंजेक्शन्स द्यायला सुरुवात केली. मीही त्या औषधांना प्रतिसाद द्यायला लागलो. सहा महिन्यांतच मी बरा झालो. डॉ. पतिपत्नीही म्हणाले, पैसे देऊ नकोस. त्याची जरुरी नाही. मीही विचारात पडलो. डॉक्टर पैसे देऊ नकोस का म्हणतात? कारण पैशाच्या या दुनियेत माणुसकीचा झरा असलेली माणसं विरळाच. डॉ. स्मिता व भरत एक व द्वारकानाथ संझगिरी- माझा मित्र दुसरा.

पैसे द्यावे लागले नाहीत म्हणून मी म्हणत नाही. माणसं प्रेमावर जगतात. शेवटी माणूस हा एकटा! त्याला प्रेमाचीच जरूर. प्रेम तेही निःस्वार्थी या जगात मिळणं महाकठीण. नातेवाईकही तोंड फिरवतात. आईचं प्रेम हे श्रेष्ठ. तसंच प्रेम मला त्यांच्याकडून मिळालं.

प्रेमात श्रद्धा असावी लागते म्हणूनच कदाचित डॉक्टरांनी त्यांच्या नर्सिंग होमचं नाव 'श्रद्धा' ठेवलं असावं.



डॉ. भरत आणि डॉ. स्मिता रुग्णाची प्रेमळपणाने चौकशी करताना.

तर काय श्रद्धेविषयी!

डॉ. भरत व स्मिता वलवानी यांचं श्रद्धा नर्सिंग होम आहे बोरिवली भागात शांती आश्रमाच्या मागे. तसं बघायला गेले तर मुंबईत इस्पितळं भरमसाट, पण श्रद्धा नर्सिंग होम वेगळं. रस्त्यावर राहणाऱ्या मनोरुग्णांसाठी. रस्त्यावर कोणी स्वखुषीने रहात नाही. परिस्थितीच त्याला कारणीभूत ठरते. मुंबईसारख्या मोठ्या औद्योगिक शहरात बहुतेक लोक नोकरीच्या शोधात येतात. आणि फसवले जातात. पैसे, जे काही असतील ते संपतात. परिस्थितीच्या तणावाखाली हे लोक खचून जातात. परिस्थितीमुळे मुख्यतः हे मानसिक तणावाखाली येतात. हताश होतात व रस्त्यावर फिरू लागतात. मग भीक मागणं आलं. अन्नासाठी दाहीदिशा फिरतात. परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेले हे लोक मनोरुग्ण होतात. रेल्वे प्लॅटफॉर्मवर, रस्त्यावर, कचरापेटीजवळ, दाढी वाढलेली, भयाण विमनस्क चेहरा, भुकेमुळे असहाय झालेले हे मनोरुग्ण तुम्हाला दिसलेही असतील. अशाच मनोरुग्णांना डॉक्टर पती- पत्नी शोधतात. त्यांच्याशी प्रेमाने बोलतात. पैशाची कोणतीही आशा न ठेवता त्यांना श्रद्धा नर्सिंग होममध्ये घेऊन येतात. त्यांच्यावर उपचार करतात. त्यांना आसरा, सहारा देतात. त्यांना बरं करतात. शिवाय त्यांचा पत्ता शोधून त्यांना त्यांच्या आप्तस्वकीयांकडे पाठवतात. डॉ. पती-पत्नींनी हे एक व्रतच हाती घेतलंय. समाजसेवेचं व्रत!



पूर्वीचा पांडुरंग



आताचा पांडुरंग

डॉ. भरत व स्मिता शिकत असतानाच एकमेकांच्या प्रेमात पडले व लग्न करायचा निर्णयही त्यांनी तेव्हाच घेतला. हॉस्पिटलमध्ये जाताना त्यांच्या लक्षात आलं की रस्त्यावरच्या कचरा पेटीजवळ, रेल्वे प्लॅटफॉर्मवर स्वतःशीच बडबडणारे, भीक मागणारे, हावभाव करणारे, कचरा पेटीतल्या अन्नावर निवारा करणारे खूपजण मनोरुग्ण आहेत. तेव्हाच त्यांनी या मनोरुग्णांसाठी एक पुनर्वसन केंद्र उघडायचं ठरवलं. श्रद्धा बोरिवलीला आहेच. शिवाय फक्त रस्त्यावरील रुग्णांसाठी दहिसरलाही त्यांनी एक हॉस्पिटल, श्रद्धा पुनर्वसन केंद्र उभारलंय. ते लवकरच सुरू होईल.

सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे मानसिक रुग्णाला समाज आपला मानत नाही. स्वीकारत नाही. समाज झिडकारून टाकतो ते फक्त मानसिक रुग्णालाच! शारीरिक दुखणं, आजार असणाऱ्यांकडे समाज सहानभुतीने बघतो. त्याला जवळ करतो. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. मानसिक तणावामुळेही शारीरिक आजार होतो. शारीरिक आजारामुळेही त्याची मनोवस्था बिघडते. मानसिक रुग्णाला कुष्ठरोग्यासारखं समाजानं टाकल्यामुळे त्याला ना व्यवस्थित व्यवसाय करता येत, ना नोकरी!

म्हणूनच डॉक्टर पतिपत्नींनी कुवतीप्रमाणे त्यांच्या हॉस्पिटलमध्ये खूपजणांना नोकरी दिली आहे. परिस्थितीतील हा बदलच रुग्णाला मदतीचा हात देतो. व्यवसाय असो वा नोकरी, माणूस त्याच्या आजुबाजूच्या परिस्थितीमुळे म्हणजेच राजकारण, पैसे खाणारे आजुबाजूचे लोक मग त्यात त्याचे वरिष्ठ अधिकारी असो वा त्याचे सहकारी असोत, जबरदस्त मानसिक तणावाखाली येतो. कौटुंबिक तणाव म्हणजेच पती- पत्नी यांचे संबंध, मुलांचे, आईवडील व भाऊ- बहीण यांचे संबंध यामुळेही जबरदस्त तणावाखाली माणूस येतो. त्यात सुशिक्षित माणसास देशाची परिस्थिती, राज्य करणाऱ्यांचे गलिच्छ राजकारण, खेडी, शहरातील उद्वेगजनक परिस्थिती यामुळेही नैराश्य, वैफल्य येतं.

## सुधीर फडके

जवळच्या नातेवाईकाचा मृत्यू हाही माणसास उद्वेगजनक बनवतो. ही परिस्थिती सतत बदलत राहते. या कालचक्राच्या भोवऱ्यात सापडलेला माणूस अत्यंत मानसिक तणावामुळे मनोरुग्ण होतो. म्हणूनच डॉक्टर पतिपत्नींचे मनोरुग्णांना नोकरी देण्यामागचं कारण असावं. मीही व्यवसायाने इंजिनीयर. परंतु मानसिक तणावामुळे नोकरी सोडली परंतु डॉक्टरांनी सहानुभूतीचा हात दिला व मला हॉस्पिटलमध्येच नोकरी दिली.

१७९५ साली पिनेल त्यांनी फ्रान्समध्ये मनोरुग्णांसाठी इस्पितळ उघडलं. या हॉस्पिटलमध्ये दाखल केल्या गेलेल्या मनोरुग्णाना पिनेल यांनी त्यांच्याच हॉस्पिटलमध्ये नोकरी द्यायला सुरुवात केली. असं केल्यावर त्यांच्या लक्षात आलं की या रुग्णांना नोकरी दिल्यावर हॉस्पिटलमधील वातावरण एकदम शांत होते. मनोरुग्णही मन लावून काम करतात. हाच आदर्श डॉ. भरत व डॉ. स्मिता यांनी ठेवला असावा.